# शासकीय तंत्रनिकेतन जालना

जालना-छ.संभाजीनगर रोड, नागेवाडी, जालना

Ph No. 02482 - 299099, 282323

E_Mail : principal.gpjalna@dtemaharashtra.gov.in

Web Address: www.gpjalna.ac.in

DTE CODE - 2014 AICTE ID: 1-804497011 MSBTE CODE - 0120


जा.क्र.शातंनिजा/आस्था-२/२०२५/ 3072 दिनांक : 29 NOV 2025

## अकुशल कामगार पुरविण्यासाठी निविदा सूचना

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी शासकीय तंत्रनिकेतन, जालना या संस्थेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे काम करण्यासाठी कंत्राटी कामगार पुरविणाऱ्या एजन्सीकडून कंत्राटी अकुशल कामगार पुरविणेसाठी दोन लिफाफा पध्दतीने सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | अकुशल कामगार संख्या | ०४ अकुशल कामगार |
| २. | निविदा फॉर्मची किंमत | रु. १५००/- ना परतीची रक्कम |
| ३. | बयाणा रक्कम रुपये | रु. १०,०००/- (दहा हजार रुपये मात्र) परतीची रक्कम |
| ४. | सुरक्षा ठेव | १,००,०००/- (एक लक्ष रुपये फक्त) |
| ५. | निविदा फॉर्मची किंमत अदा करणेसाठी | रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ६. | बयाणा रक्कमेची डीडी काढणे | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना Payable at जालना |
| ७. | निविदा उपलब्ध होण्याचे ठिकाण | श्री एस. सी. जोशी, वरिष्ठ लिपीक, शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| ८. | निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक ०२/१२/२०२५ ते दिनांक १५/१२/२०२५ दु.२.०० पर्यंत सुटीचे दिवस वगळून |
| ९. | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दिनांक ०२/१२/२०२५ ते दिनांक १५/१२/२०२५ दु.४.०० पर्यंत सुटीचे दिवस वगळून |
| १०. | सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांचा तपशिल निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबतच सादर करण्यात यावे. | |
| ११ | निविदा उघडण्याची तारीख दि. १७/१२/२०२५ दु.०२.०० वा. | |

१. निविदा संस्थेच्या कार्यालयात आवक/जावक विभागात कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यात जमा करावे.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांनी निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

३. निविदेमध्ये भरलेले दर हे करारातील ११ महिन्याच्या कालावधीसाठी अंतिम राहतील.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, जालना

निविदा क्र. ................

## निविदा भरण्यासाठी आवश्यक सूचना

**<u>निविदेच्या/सेवेच्या अटी व शर्ती</u>**

१. सदर कंत्राटाचा कालावधी दि.०१/०१/२०२६ ते दि. ३०/११/२०२६ (११ महीने) राहील.

२. कंत्राटी अकुशल कामगार पुरविणेसाठी दोन लिफाफ्यात सीलबंद निविदा भरावयाची आहे.

३. निविदा फी रु. १५००/- (ना-परतावा) रोखीने रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे भरण्यात यावे व पावती जोडावी.

४. Earnest Money Deposit (EMD) / बयाणा रक्कम रु. १०,००० (रुपये दहा हजार फक्त) नॅशनलाइज बँकेचा डी.डी. PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, JALNA PAYABLE AT JALNA यांचे नावाने काढून ओरीजनल डी.डी. निविदेसोबत सादर करावे. किंवा सुट लागु असल्यास कागदपत्रे सादर करावी.

५. रकान्यात सुचविलेले सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करण्यात यावे. निविदेसोबत तांत्रिक लिफाफ्यात फक्त कागदपत्रांची छायांकित प्रती सादर करावयाची आहे. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रे / परवाना / नोंदणीकृत इ. निविदा दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत नुतणीकरण केलेला असावा.

६. Technical Bid तांत्रिक लिफाफ्यात मागणी केलेले मुळ कागदपत्रे निविदा उघडण्याची दिवशी निविदाधारकाने सोबत ठेवावे ऐनवेळी मुळ कागदपत्रे सादर न केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

७. Technical Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधी संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. Technical Bid तांत्रिक लिफाफ्यातील पात्र निविदाधारकांनी Commercial Bid उघडणेचे वेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८. अपूर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

९. निविदा फी ची झेरॉक्स प्रत व बयाणा रक्कमेचा मुळ डीडी शिवाय सादर केलेल्या निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.

१०. Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असावा.

११. कामाची वेळ सकाळी ९.०० वा. ते साय ६.१५ कार्यालयीन कामकाजानुसार कामाच्या वेळेत बदल करण्याचे अधिकार प्राचार्य यांना राहतील. **तसेच आवश्यकता वाटल्यास सुटीच्या दिवशी कामकाज करणे बंधनकारक राहील.**

१२. प्राचार्यांनी ठरवून दिलेल्या वेळेत व सोपविलेले कामे करणे बंधनकारक राहील.

१३. कर्मचारी संख्या ०४ पेक्षा कमी आढळल्यास शासनाचे किमान वेतनधोरणानुसार कमी असलेल्या संख्येच्या मजुरी इतकी रक्कम पुर्वसुचनेविना आपल्या करारातील रक्कमेतुन वसुल केली जाईल.

१४. कंत्राटी अकुशल कामगार सुटीवर गेल्यास त्याच्या जागी पर्यायी व्यवस्था करणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील व त्याचे मानधन या संस्थेकडुन देय राहणार नाही.

१५. करारातील मोबदल्याशिवाय इतर कसलेही मानधन अथवा भत्ते या संस्थेकडुन देय राहणार नाही.

१६. कंत्राटी अकुशल कामगार मद्यपान अथवा तत्सम अमली पदार्थ सेवन करुन कर्तव्यावर हजर राहणार नाहीत याची हमी कंत्राटदाराने देणे बंधनकारक आहे तसे आढळल्यास त्यास त्वरीत कामावरून कमी केले जावून व त्या अकुशल कामगाराएवजी पर्यायी कामगाराच्या नियुक्तीची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. गैरवर्तनाच्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल.

१७.कंत्राटदाराने मध्येच सेवा समाप्त केल्यास अथवा त्याच्या सेवा असमाधानकारक आढळल्यास त्यांचे कंत्राट रद्द करुन शासनास होणारा भुर्दड करारनाम्यासोबत दिलेल्या अनामत रकमेतून वसुल करण्यात येईल .

१८.निविदा दर हे निविदा मजुंर झाल्यापासुन (दि.०१/०१/२०२६ ते दि. ३०/११/२०२६) ११ महिन्यापर्यतच वैध राहील. **निविदेतील दर हे किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार व शासनाच्या ध्येय धोरणानुसार असावेत व** एकदा भरलेले दर कायम राहातील व त्याच्यात कसलीही वाढ करण्यात येणार नाही.

१९.कामावर असतांना कंत्राटी कामगारांनी एजन्सीकडून दिलेला गणवेश परीधान करणे व ओळखपत्र लावणे बंधनकारक राहील. **तसे न झाल्यास कंत्राटदाराचे देयके अदा करण्यात येणार नाहीत.**

२०.सदरचे कर्मचारी संस्थेत पुरविण्यात येणाऱ्या सेवाच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या आपात्कालीन परिस्थितीत आवश्यकतेनुसार सेवा पुरवतील. संस्थेत काम करताना वरिष्ठांनी जसे प्राचार्य / उपप्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता / शासकीय कर्मचारी यांनी दिलेली सर्व कामे वेळेवर व न चुकता करावी लागतील. नेमुन दिलेल्या विभागातील / संस्थास्तरावरील साफसफाई (ओला / सुका ) करणे, झाडांची देखभाल राखने, जड सामानाची हालचाल व ने आण करणे. **विभागात पाणी व्यवस्था, परीसराची स्वच्छता राखणे इत्यादी कामे करावी लागतील.**

२१.निविदा आवंटित झालेल्या पात्र निविदाधारकास रुपये १,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) एवढी सुरक्षा ठेव डीडी स्वरुपात जमा करावे लागेल.

२२.कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगार धुम्रपान किंवा नशापानी, संस्थेतील कोणत्याही वस्तूंची चोरी / हानी व गैरवर्तन करणार नाही याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल, याअनुषंगाने उध्दभवणाऱ्या सर्व घटनांस / परिणामास पात्र निविदाधारक संपूर्णत : जबाबदार राहतील. संस्था त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२३.संस्थेत गैरवर्तन केल्यास, काम समाधानकारक न झाल्यास त्यादिवशीचे वेतन कमी करण्यात येईल.

२४.कामगार कायदयातील तरतुदीनुसार व शासनाच्या ध्येयधोरणानुसार कामगाराच्या हिताचे रक्षण करण्याची किंवा नुकसान भरपाई अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच कामाच्या ठिकाणी कंत्राटी कामगारास जखम, ईजा किंवा अपघात मृत्यु झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराचीच राहील. या कार्यालयाकडून कुठलीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

२५.नियुक्त विभागातील सामानाची साफसफाई करताना,वस्तूची तोडफोड व क्षतीग्रस्त होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी कंत्राटी कामगारास बांधनकारक राहील. तोडफोड अथवा क्षतीग्रस्त वस्तूंची नुकसान भरपाई करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२६.**संस्थेमध्ये कामकाज करताना वस्तुंची तोडफोड व क्षतीग्रस्त होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी व नुकसान भरपाई कंत्राटी कामगारास बंधनकारक राहील.**

२७.संस्थेमध्ये / वसतीगृहामध्ये जड सामान नेणे / बदलणे / जागा बदल करणे इत्यादी कामे कर्मचाऱ्यांना करणे बंधनकारक राहील.

२८.कामगारांसाठी स्वतंत्र हजेरीपत्रक निविदाधारकाने पुरविणे बंधनकारक राहील. **व सदर हजेरी पुस्तकानुसार महीन्याचे वेतन देयके पारीत करण्यात येतील.**

२९.कामगारांच्या उपस्थिती कालावधीनुसार देयके कार्यालयास प्रत्येक महिन्याचे देयके महिना संपल्यानंतर तीन प्रतीत प्रतिमाह कार्यालयास सादर करण्याची जबावदारी कंत्राटदाराची राहील व देयकाची रक्कम
कोषागारातून देयके पारित झाल्यावर मिळेल.

३०.देयके पारीत करणे हे शासनाकडून उपलब्ध अनुदानावर अवलंबुन राहील व अनुदान उपलब्ध नसल्यास देयके पारित होणाऱ्या विलंबास संस्था जबाबदार राहणार नाही. अशा परिस्थितीत शासनाकडून अनुदान उपलब्ध होईपर्यंत कामगारांचे वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. **अनुदान प्राप्त न झाल्याने देयकाचे वितरण, न झाल्यास या सबबीखाली कंत्राटदाराकडुन सेवा खंडीत करता येणार नाही. तसे झाल्यास शासकीय कामात अडचण निर्माण केलेली समजुन अनामत रक्कम जप्त करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांना राहील.**

३१.मासिक देयकांमध्ये शासनाकडून आकारले जाणारे सर्व कर व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करणे व याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकास बंधनकारक राहील व देयकामध्ये कुठल्याही प्रकारच्या कराच्या रकमेचा वेगळयाने समावेश करु नये

३२.पुरविलेल्या कंत्राटी कामगारांचे कायदेशीर रकमा ( उदा. वेतन, पीएफ, विमा इ) कामगारास नियमाप्रमाणे अदा करण्याची व त्यांच्या खाती जमा करण्याची जबाबदारी पात्र निविदाधारकाची राहील. सदर बाबत कंत्राटी कामगारांच्या देय रकमांची कोणतीही जबाबदारी या संस्थेची राहणार नाही.

३३.निविदा दर हे कायम राहील व त्याच्यात कसलीही वाढ करण्यात येणार नाही. कामाची गुणवत्ता पाहून व गरज वाटल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छ.संभाजीनगर यांच्या मान्यतेच्या अधिन राहुन देण्यात येईल.

३४.सदरील निविदा बाबत कसलाही वाद उपस्थित झाल्यास याबाबत न्यायालयीन कार्यक्षेआकरीता जालना मुख्यालय राहील.

३५.निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

३६.कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचे किवा रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना याचेकडे राखुन ठेवले आहेत.

३७.निविदेतील दरात साम्य असल्यास त्याबाबत अंतिम निर्णय मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना हे राहील.

३८.शासकीय तंत्रनिकेतन जालना ही शैक्षणीक संस्था असल्याने संस्थेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दुष्टीकोनातुन कंत्राटदाराने पुरविण्यास येणा-या एकुण चार कंत्राटी कामगारांची खालील प्रमाणे कागदपत्रे त्यांचे लेटरहेड वर कंत्राटदाराच्या स्वाक्षरीनिशी कार्यदेश मिळाल्यापासुन १० दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

अ) कंत्राटदार व कंत्राटी कामगार यांची १०० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रपत्र 'ब' सादर करणे.

ब) पूरविण्यात येणारे कंत्राटी कामगार हे शारीरीक दुष्टया सुदुढ असून २१ ते ३५ या वयोगटातील असणे बंधनकारक असुन त्यासाठी सक्षम प्राधीका-यांचे फीटनेस प्रमाणपत्र सादर करणे.

क) पूरविण्यात येणारे कंत्राटी कामगार हे गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याचे सक्षम प्राधीका-यांचे चारीत्र्य प्रमाणपत्र (पोलीस ठाणे) सादर करणे.

ड) पूरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांच्या आधार कार्डाची छायांकीत प्रत सादर करणे.

इ) पूरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांच्या वयासबंधी पुरावा (शाळेचा दाखला)ची छायांकीत प्रत सादर करणे.

वरील प्रमाणे कागदपत्रे सादर न केल्यास कंत्राटदाराचे एकही देयक पारीत करण्यात येणार नाही.

३९.पात्र निविदाधारकास निविदा कार्यादेश मिळाल्याच्या तारखेपासून दोन दिवसाचे आत कंत्राटी कामगार पुरविणे आवश्यक राहील. तसे न केल्यास कंत्राटदार कंत्राटी कामगार पुरविण्यास इच्छुक नसल्याचे समजून संस्थेकडे जमा केलेले बयाणा रक्कम शासन जमा करण्यात येईल व सदर परिस्थितीमध्ये निविदा हे तुलनात्मक दृष्टया कमी दर २ (L-2) कंत्राटदास देण्यात येईल.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, जालना

**निविदा क्र. ...............**

**खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांची साक्षांकित छायाप्रती तांत्रिक लिफाफयात (Technical Bid) सादर करावेत.**

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | जोडले असल्यास √मार्क करावे |
|---|---|---|
| | **अत्यावश्यक कागदपत्रे** | |
| ०१ | निविदा फी भरल्याची पावतीची **(झेरॉक्स प्रत)** | |
| ०२ | बयाणा रकमेचा डीडी **(ओरीजनल)** | |
| ०३ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी असल्याचा दाखला/ उदयोग आधार / समकक्ष नोंदणी प्रमाणपत्र **(सदस्थितीत Valid किंवा नुतनीकरण झालेले असावे)** | |
| ०४ | ठेकेदारी पध्दतीने कामगार पुरवठा करण्याचा कंत्राट कामगार कायदा (आर ॲन्ड ए) १९७० नुसार वैध परवाना **(सदस्थितीत Valid किंवा नुतनीकरण झालेले असावे)** | |
| ०५ | भविष्य निर्वाह निधी नोंदणी दाखला **(इपीएफ प्रमाणपत्र)** | |
| ०६ | Implementation of ESI act-1948 and registration of employee of factory and establishment under section 1(5) of the act as amended नुसार नोंदनीकृत दाखला | |
| ०७ | Central board of excise and customs certification / वस्तू व सेवा कर रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र **(जीएसटी प्रमाणपत्र)** | |
| ०८ | संस्थेचे पॅन कार्डची छायांकीत सत्यप्रत | |
| ०९ | निविदाधारकाचे आधार कार्ड ची छायांकीत सत्यप्रत | |
| १० | संस्था काळया यादीत नसल्याचे निबंधकाचे प्रमाणपत्र अथवा संस्थेच्या लेटरपॅडवरील शपथपत्र | |
| ११ | ठेकेदारची किंवा संस्थेची मागील ३ वर्षाची उलाढाल प्रत्येक वर्षाला २५ लाखाचे वर असणे गरजेचे आहे व तसे सी.ए. चे प्रमाणपत्र (Year 2022-2023, 2023-24,2024-25) | |
| १२ | संस्थेच्या पात्रता व आर्थिक उलाढाल क्षमतेसाठी संस्थेचे मागील ३ वर्षाचे सी. ए. कडून तपासणी झालेल्या अहवालाच्या सत्यप्रती (Audit Report of year 2022-2023, 2023-24,2024-25) | |
| १३ | मागील ५ वर्षात (केंद्रशासन/ राज्य शासन अथवा खाजगी) आस्थापनेमध्ये कंत्राटी कामगार पुरविण्याचा अनुभव असल्याचे व समाधानकारक काम पुर्ण केल्यासंबंधी सक्षम अधिकाऱ्याचा दाखला. (वेगवेगळया आर्थिक वर्षातील ११ महिने कालावधीचे किमान २ अनुभव प्रमाणपत्र) | |
| १४ | बँकेकडील किमान रु. ०५ लक्ष रुपयाचे साल्व्हन्सी प्रमाणपत्र **(चालु आर्थिक वर्षातील असावे)** | |
| १५ | कंत्राटदाराकडून कामगारांचा कराराचा कालावधी करिता वेतन देण्याची क्षमता असल्याचा लेखी पुरावा / हमीपत्र | |
| | अतिरिक्त कागदपत्रे | |
| १६ | निविदा संबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तीचे नाव व अधिकार पत्र | |
| १७ | सध्या काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यदेशाच्या सत्यप्रती | |
| १८ | निविदाधारकाची माहिती | |

**टिप :- वरील पैकी कोणतेही कागदपत्रे लागू नसल्यास / त्यात सुट असल्यास त्या बाबतचे खुलासा करणारे कागदपत्रे निविदेतील कागदपत्रा सोबत जोडावेत. वरील कागदपत्रे योग्य त्या लिफाफासोबत सादर करावेत.**

## निविदाधारकाची माहिती

१) निविदा धारकाचे नाव :-.................................................................

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :-.......................................................

.......................................................................

३) कार्यालय दुरध्वनी क्रमांकः-...............................................................

- निवासः-...................................................................
- मोबाईल नंबरः-..............................................................
- ईमेलः-....................................................................

४) संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव :-..........................................................

- मोबाईल नंबर :-.............................................................

५) मालकाचे/भागीदाराचे नाव :-...............................................................

६) ठेकेदारीचा नोंदणी क्रमांक :-..............................................................
(शॉपअॅक्ट/कंपनी अॅक्ट प्रमाणे)

७) औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर :-............................................................

८) सध्याचे लेबर लायसन्स नंबर :-...........................................................

९) पीएफ कोड अकांऊट नंबर :-..............................................................

१०) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र किंवा जीएसटी क्रमांक :-...........................................

११) व्यवसायकर नोंदणी नंबर :-................................................................

१२) कर्मचाऱ्यांची एकुण संख्या :-...............................................................

१३) आयकर पॅन नंबर :-.........................................................................

१४) निविदाधारकाचे आधार कार्ड नंबर :- ..................................................

१५) बँक खाते क्रमांकः-.........................................................................

१६) आयएफएससी कोडः-.........................................................................

निविदाधारकाची सही व शिक्का

---

## हमीपत्र

जर माझी निविदा पात्र झाल्यास कार्यादेशावेळी निविदेतील अटी व शर्ती सह १०० च्या बाँड पेपरवर नोटरी करून अतिरिक्त आवश्यक हमीपत्रासह मी कार्यालयात जमा करेल

निविदाधारकाची सही व शिक्का

# <u>प्रपत्र - ब</u>

**कंत्राटी तत्वावर अकुशल कामाकरीता सेवा पुरविणा-या कंत्राटदाराने कामावर ठेवण्यात येणा-या अकुशल कामगाराकडून १०० रूपये च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून घ्यावयाचे हमीपत्र.**

## <u>हमीपत्र</u>

मी. ---------------------------------------------------------------------------

संपुर्ण पत्ता ------------------------------------------------------- असे लिहुन देते/देतो की, मी ------------------------------------------ या कंत्राटदारामार्फत स्वेच्छेने स्विकारलेल्या अकुशल कामगार या कामाकरीता संबधीत यंत्रणेच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. जर माझ्या कडुन अटी व शर्तीचा भंग झाला तर कंत्राटी स्वरूपाच्या कामावरून काढल्यास मी स्वतः जबाबदार राहील.

तसेच मी स्वेच्छेने स्विकारलेल्या अकुशल कामगार या कंत्राटी स्वरूपाच्या कामादरम्यान तसेच कंत्राट संपल्यावर मला कायमस्वरूपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही तसेच सदर सेवेबाबतची कंत्राटदार तसेच शासनावर (संबंधित शासकीय यंत्रणेवर) कोणतेही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटी सेवेशी निगडीत कायम नियुक्ती संदर्भात मी कोणत्याही नायालयात कोणताही प्रकारचा दावा व हक्कासाठी मागणी करणार नाही अशी हमीपत्राव्दारे मी हमी देत आहे.

दिनांक :- स्वाक्षरी :-

ठिकाण :- नाव :-

पत्ता :-

मी कंत्राटदार ---------------------------------------------- लिहुन देतो की, वरील प्रमाणे मी कामावर ठेवण्यात आलेले अकुशल कामगार श्री.----------------------------------------- यांचेकडुन हमीपत्र माझे समक्ष लिहुन घेतलेले असून सदर हमीपत्राचे संबधीताकडुन भंग झाल्यास सदर बाबी संदर्भात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याबाबत सर्व बाबी हाताळण्यास मी स्वतः जबाबदार राहील.

दिनांक :- स्वाक्षरी :-

ठिकाण :- कंत्राटदाराचे नाव :-

शिक्का :-

# घोषणापत्र

(काळया यादीत नसल्याबाबत)

मी / आम्ही मे ............................................................................ कंत्राटदार असे जाहीर करतो की, आमची संस्था मे................................................................................ ला महाराष्ट्र राज्य किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेने निविदेत भाग घेण्यासाठी मागील पाच वर्षात काळया यादीत टाकलेली नाही. किंवा निविदा प्रकीयेत सहभाग घेण्यासाठी बंदी घातलेली नाही. तसेच संस्था / संस्था चालक यांच्या विरूध्द कोणत्याही खटला प्रलंबित नाही.

स्वाक्षरी ..............................................

नाव ..............................................

संस्थेचे नाव व पत्ता ..............................................

संस्थेचा शिक्का ..............................................

दिनांक ..............................................